“नागरी स्थानिक स्वशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या : नांदेड जिल्हा एक चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत ‘लोकप्रशासन’ या विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी करीता सादर करावयाचा शोध प्रबंधाचा प्रारुप आराखडा

:: संशोधक ::

इरबतनवाड गोदावरी तुकाराम

सहाय्यक प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
ता.बिलोली, जि.नांदेड.

:: मार्गदर्शक ::

डॉ.जी.टी.यमलवाड

संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख
लोकप्रशासन विभाग
लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद.
ता.धर्माबाद, जि.नांदेड-431809

मे – 2016

"नागरी स्थानिक स्वशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या : नांदेड जिल्हा एक चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना (Introduction):

भारतात जरी अति प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या तरी त्यांची कार्ये अतिशय मर्यादित होती. नागरिकांनाही स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे काय? त्या संस्थेची कामे कोणती याचीही माहिती नव्हती. मात्र काही वेळा असे म्हटले जाते की, आजच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे मुळ प्राचीन काळात होते. स्थानिक स्वराज्य संस्थेची आजची जी काही कामे आहेत त्यातील फक्त गावाची स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची, आड विहिरी खोदणे एवढीच कामे स्थानिक प्रशासनामार्फत केली जात. वेदात तसेच मनु व कौटिल्याच्या ग्रंथावरुन कामाचे स्वरुप वर उल्लेखल्याप्रमाणे असल्याचे नमुद आहे. बुध्दाच्या काळातही कामाच्या या स्वरुपात बदल आला नव्हता. रामायण व महाभारताच्या काळात पैरा निगमा, पौगा व गण यासारख्या संस्था गावातील कामे करण्यासाठी अस्तित्वात होत्या कामासाठी लागणारी साधनसामग्री स्थानिक लोकांकडुन घेतली जाई. नंरतच्या हिंदु राजांच्या काळात स्थानिक कामे करण्यासाठी गाव समिती किंवा महाजन समिती नेमली जात असे. समितीतील लोकांची निवड ही लोकांना विश्वासात घेऊन केली जात असे. अशा समितीला राजाश्रय असे. गुप्त व मौर्य काळातही हिंदू राजांनी सुरु केलेली गांव समिती महाजन समिती नेमण्याची पध्दत तशीच चालु ठेवली. पुष्कळवेळा महाजन समितीमध्ये वंशपरंपरेने नेमणुका होत.

भारतात मुघल साम्राज्य सुरु झाल्यानंतर स्थानिक कारभार पाहणाऱ्या पुर्वीच्या पध्दतीत बदल झाला. गावातील स्वच्छता, पाणी व रस्ते यासारखी कामे करण्यासाठी कोतवाल नेमला जात असे. कोतवाल पदावर नेमणुक करतांना ती व्यक्ती अनुभवी, कर्तव्यतत्पर व शांतपणे विचार करणारी आहे याची खात्री केली जात असे. कोतवाल एखादया हुशार व्यक्तीची सहाय्यक म्हणुन नेमणुक करीत असे. त्याला साफसफाई दिवाबत्ती व पाण्याची सोय करण्यासाठी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य होते. तसेच

गावातील घडामोडसंबंधी मुघल सम्राटांना मातिही पुरविण्याचे कामही त्यालाच करावे लागे.

ब्रिटिशांनी पाश्चात्य देशामध्ये जसे स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वरुप होते तशा प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था स्थापनेचा पाया घातला. पण सुरुवातीच्या काळात स्थानिक लोकांकडे गावचा कारभार सोपविण्याचा हेतु नव्हता. त्या काळाच्या शहरांतील स्वच्छता, आरोग्य व त्यासाठी सरकारी तिजोरीतुन खर्च करावा लागे. हा खर्च स्थानिक लोकांनीच केला तर सरकारचा खर्च कमी होईल. या हेतुनेच सन 1687 साली मद्रास शहरासाठी महानगरपालिका स्थापन प्रथमच सुरुवात झाली. या महानगरपालिकेचा कारभार महापौर व निवडक जेष्ठ नागरिकांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांना ठराविक कर आकारण्याचा अधिकार दिला. कर आकारणीस नागरिकांनी तीव्र विरोध केला. त्यामुळे सन 1727 साली महानगरपालिका बंद केली व त्याऐवजी मेयर्स कोर्टची स्थापना केली. मेयर्स कोर्टाकडे प्रशासकीय कामापेक्षा न्यायदानाचेच काम जास्त होते. यानंतर सन 1793 च्या चार्टर ॲक्टने मुंबई, मद्रास व कलकत्ता या शहरांसाठी नगरपालिका स्थापन केल्या. या शहरांचा कारभार पाहण्यासाठी जस्टिस ऑफ पीस (जे.पी.) नेमण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला मिळाला जस्टिस ऑफ पीस कर लावण्याचा तसेच शहरातील रस्ते व स्वच्छता तसेच कायदा व सुरक्षिततेसाठी पोलीस नेमण्याचा अधिकार मिळाला. 1801 साली प्रथमच घरपट्टी आकारण्यास सुरुवात झाली. यामागे सरकारचे उत्पन्न वाढविणे हाच उद्देश होता. 1842 च्या बेंगॉल ॲक्टने एखादया गावातील एकुण मालमत्ता धारकापैकी 2/3 मालमत्ता धारकांनी मागणी केल्यास त्या गावासाठी ‘‘टाऊन कमिटी’’ स्थापन करण्याचा निर्णय झाला. पण या आकारणीस विरोध हेच त्यामागचे कारण होते. त्यानंतर 1850 साली संपूर्ण देशासाठी कायदा करुन प्रांतिक सरकारकडे नगरपालिका स्थापका करण्याचा अधिकार दिला. स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याच्या सुरुवातीच्या काळात ब्रिटीशांचा हाच उद्देश होता की ब्रिटीशांच्या हिताचे संरक्षण करणे. स्थानिक लोकांकडे कारभार सोपविण्याचा उद्देश नव्हताच. उलट स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करुन नागरिकांचे सहकार्य मिळवायचे व कर

लादण्याचे काम सुकर करायचे व सरकारवरील खर्चाचा भार कमी करायचा हाच उद्देश होता. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्या तरी त्या संस्थांत स्थानिक लोकांना काही स्थान नव्हते. निवडणुकीद्वारे लोकप्रतिनिधी निवडून त्यांच्याकडे कारभार सोपविण्याचे धोरण अवलंबिले नाही. तर सरकार नियुक्त सदस्यांकडुन कारभार केला जात असे. स्थानिक स्वराज्य संस्थेसंबंधी एकापाठोपाठ कायदे करुनही लोक समाधानी नव्हते. जनतेमध्ये स्वातंत्र्याची भावना हळुहळु जोर धरत होती.

देशातील एकंदर परिस्थितीचा विचार करुन सन 1870 साली लॉर्ड मेयोने एक ठराव मंजुर करुन असे जाहिर केले की, भारतीय लोकांचा प्रशासनात सहभाग वाढविण्यासाठी स्वराज्य संस्था स्थापन करणे हा उत्तम मार्ग आहे. या ठरावाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था स्थापनेचा अधिकार केंद्र सरकारऐवजी प्रांतिक सरकारकडे सोपविला. या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास होईल असे त्यांचे मत होते. सन 1882 पर्यंत देशात ज्या-ज्या ठिकाणी संस्था होत्या. त्या संस्थाच्या कारभारामध्ये भारतीय लोकांना काही स्थान नव्हते. "लोकल सेल्फ गव्हर्नमेंट" म्हणजे "लोकल" ही नाही आणि "सेल्फ" ही नाही अशी स्थिती होती. सन 1857 च्या पहिल्या स्वातंत्र्य युध्दानंतर ब्रिटिश सरकारविरुध्दचा असंतोष वाढत होता शिक्षणाचा प्रसारही होत होता. शिकलेल्या लोकांमध्ये जागृती निर्माण होत होती. ब्रिटिश सरकारकडुन अधिक स्वातंत्र्य मिळावे अशा मागण्यांचा जोर वाढू लागला होता.

भारतीय नागरिकांना खूष करावे. त्यांचा ब्रिटीश सरकार विरुध्दचा असंतोष कमी व्हावा यासाठी गव्हर्नर लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाचा एक प्रस्ताव तयार केला या प्रस्तावास भारताच्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासात एक वेगळे महत्व आहे. म्हणुन लॉर्ड रिपन यांना स्थानिक स्वराज्य संस्थाचे जनक म्हणटले जाते. भारतातील सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी 1907 साली ब्रिटिश सरकारने रॉयल कमिशन नेमले या कमिशनचा अहवाल 1909 साली प्रसिध्द झाल्या. भारत सरकारने या अहवालाचा कोणताच निर्णय घेतला नाही. पुढे पहिले महायुध्द सुरु झाले. युध्दात भारतीयांचा पाठिंबा मिळावा म्हणुन ब्रिटिश सरकारने मॉटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा 1919 चा कायद्याद्वारे

काही सुधारणा दिल्या. या कायद्याने प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्था हाविषय केंद्र सरकारकडुन राज्य सरकारकडे सोपविण्यात आला. त्याचा चांगला परिणाम असा झाला की, प्रांतांनी परिस्थितीनुरुप नियम केल्यामुळे जनतेच्या मनात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत आपुलकी निर्माण झाली.

1919 च्या कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत पुढील बदल झाले.

1) स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना निवडणुकीच्या आधारावर करण्यात आली. जनतेद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींच्याकडे प्रशासकीय सत्ता आली.

2) अध्यक्षाचे पद अशासकीय व्यक्तीस देण्याची तरतूद करण्यात आली.

3) उत्पन्नात वाढ करण्यासाठी आर्थिक अधिकार देण्यात आले.

या कायद्यामधील तरतुदीनुसार सन 1924 साली पंडीत जवाहरलाल नेहरु हे अलाहाबाद नगर पालिकेचे अध्यक्ष झाले व पुढे विजयालक्ष्मी पंडीत या सन 1934-35 या काळात अलाहाबाद नगरपालिका बोर्डाच्या अध्यक्षा झाल्या. स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक महान नेत्यांनी नगरपालिकांचे अध्यक्षपद भुषविले. त्यात सरदार वल्लभभाई पटेल व सरोजनी नायडू यांचा समावेश होतो. 1919 च्या कायद्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात काही फरक पडला नाही. पुरेसा निधी नसल्यामुळे सेवा सुविधा पुरविण्याच्या योजना राबवता येत नव्हत्या.

1919 च्या कायद्यातील दोष त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने 1935 ला एक महत्वाचा कायदा पास केला. या कायद्याद्वारे प्रांतिक सरकारची स्थापना झाली. या कायद्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्ता बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न होऊ लागले. त्या अधिक लोकशाहीवादी बनविण्यासाठी मतदाराची वयोमर्यादा कमी करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थात नियुक्त करण्यात येणा-या सदस्यांची संख्या कमी करण्यात आली ही परिस्थिती देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत अस्तित्वात होती.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन 1948 साली त्यावेळच्या आरोग्यमंत्री अमृता कौर यांनी देशातील सर्व राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मंत्र्यांची बैठक दिल्लीत बोलाविली. बैठकीचे उद्‌घाटन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी

केले. त्याप्रसंगी ते म्हणाले “स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व लक्षात घेऊन त्यांना लोकशाहीची आधारशिला म्हणुन मान्यता देण्यात आली”. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्यात नगरपालिका अधिनियम 1965 हा एकच कायदा सर्व नगरपालिकांसाठी मंजुर केला. मुंबई सोडुन नागपूर व अन्य महानगर पालिकांसाठी दोन वेगळे कायदे सन 1948 व 1949 साली मंजुर झाले. शहरांचा नियोजनबध्द विकास व्हावा, या उद्देशाने 1954 साली नगररचना व सन 1966 साली महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम मंजुर करण्यात आला. स्वातंत्र्यानंतरही नगरपरिषदांच्या आर्थिक परिस्थतीत बदल झाला नाही.

74 वी घटनादुरुस्ती घेण्यापुर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे कोणीही फारसे लक्ष दिले नाही. परंतू देशातील स्थानिक स्वराज्य संस्था बळकट व्हाव्यात त्या स्वायत्त व्हाव्यात त्यांच्या रचनेत, निवडणुक पध्दती, कालावधी या बाबतीत एक सारखेपणा असावा त्यांची प्रशासकीय यंत्रणा सक्षम व्हावी यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याचा अभ्यास करण्यासाठी व शिफारशी करण्यासाठी सन 1985 साली एक आयोग नेमला. आयोगाने आपल्या शिफारशी केंद्र सरकारला सादर केल्या. पंतप्रधान राजीव गांधी यांनी या शिफारशीवर निर्णय घेण्यापुर्वी देशातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद यांचे पदाधिकारी व अधिकारी यांची संम्मेलने आयोजित केले. त्यांचे विचार ऐकुन घेतले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे वाढते महत्व लक्षात घेऊन भारतीय घटनेला दुरुस्ती सुचविणारे 65 वी घटनादुरुस्ती विधेयक संसदेत सादर केले. हे विधेयक सन 1992 साली संसदेने मंजुर केले. या विधेयकाने घटनेत 74 वी दुरुस्ती झाली व दिनांक 24.04.1993 पासुन अंमलात आली. या ऐतिहासिक घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रथमच घटनात्मक दर्जा मिळाला.

लोकप्रशासन व खाजगी प्रशासनात व स्थानिक स्वशासनात सर्वाधिक महत्वाचा घट त्यात काम करणारा कर्मचारी वर्ग होय. शासन व्यवस्थेत दर पाच वर्षानी नवनविन राज्यकर्ते सत्तेवर येतात ते नवखे असतात शासन चालवण्यासाठी ध्येय धोरण निर्माण करतात पण या धोरणाच्या निर्मितीपासून ते त्या धोरणाची अंमलबजावणी

करणारा व शासन व्यवस्थेला स्थैर्य देणारा अतिशय महत्वाचा घटक म्हणजे कर्मचारी होय कोणत्याही शासन प्रशासनाचे यश त्यातील कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते. लोकांना प्रशासनाची ओळखसुध्दा कर्मचाऱ्यामुळेच होते. प्लेटोने'रिपब्लिकन' या ग्रंथात केला आहे. त्यामध्ये "States are as the man are, they grow out of human character" स्थानिकशासन समाजाच्या, देशाच्या विकासासाठी नैसर्गिक साधनसामग्री, पैसा, यंत्रे, तंत्राज्ञान आणि श्रम शक्तीची आवश्यकता असते. परंतु श्रमशक्ती म्हणजे कर्मचारीच तेच अन्य सर्व साधने उपयोगात आणतात, म्हणुन त्यांचे महत्व अधिक आहे. उपलबध कर्मचाऱ्यांच्या गुणवत्तेवर, कौशल्यावर, कार्यनिष्ठेवर साधनसामग्रीचा वापर आणि प्रशासकीय संघटनांच्या उद्दिष्टांचे भवितव्य अवलंबुन असते. कल्याणकारी राज्यात लोक कल्याणाच्या कार्यक्रमांची सर्व जबाबदारी लोक प्रशासनावर असते. त्यामुळे प्रशासनातील कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवुन त्यांचा विकास घडवुन आणणे, त्यांना कार्यासाठी सक्षम बनविने हे शासनाचे कर्तव्य बनले आहे.

समस्या सुत्रण (Formulation of the problem):

लोकशाहीच्या पाठशाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागरी स्थानिक स्वशासनात लोकांचे प्रतिनिधी तर असतात पण हे प्रतिनिधी अस्थाई असतात. या प्रतिनिधींची निवड ही प्रामुख्याने पाच वर्षासाठी अडीच वर्षासाठी अशा विशिष्ठ कालावधीसाठी केलेली असते हेच धोरण ठरवतात पण या धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारा व शासनकर्त्यांच्या धोरण निर्मितीपासून त्या धोरणाची अंमलबजावणीपर्यंत सर्वत्र सहकार्य करणारा महत्वपूर्ण घटक म्हणजेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी होय. या लोकशाही शासन व्यवस्थेत दर पाच वर्षाला येणाऱ्या नवनविन शासनकर्त्यांशी अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुळवून घ्यावे लागते अशाप्रकारे नवनविन शासनाशी येणारा संपर्क त्यांची धोरणे राबवतांना त्यांच्या सोबत काम करत असतांना या कर्मचारी वर्गाला अनेक समस्यांना तोंड दयावे लागते तर कधी स्वतःच्या सहकारी कर्मचारी वर्गासोबतही अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. या कर्मचारी वर्गातही महिला कर्मचाऱ्यांना तर अनेक समस्यांना तोंड दयावे लागते.

या नागरी स्थानिक स्वशासनात महिला कर्मचाऱ्यांची नेमणी काय स्थिती आहे? या कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामात शासकीय व्यक्तीसोबत कसे संबंध आहेत? या कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामात शासकीय व्यक्तीसोबत कसे संबंध आहेत? त्यांना खरोखरच राजकीय समस्या आहेत का? काही प्रशासकीय समस्या आहेत का? या कर्मचाऱ्यांना काही सामाजिक समस्या आहेत का? आर्थिक समस्या जाणवतात का? या महिला कर्मचाऱ्यांचे सहकाऱ्यांसोबत सहकार्यपूर्ण संबंध आहेत की नाही? या कर्मचाऱ्यांच्या काही वैयक्तिक समस्या आहेत का? या कर्मचाऱ्यांच्या अशा समस्या आहेत तर त्या कोणत्या आहेत? व त्या संदर्भात शासनाचे प्रयत्न काय? सर्व प्रश्न व समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनातून केला आहे.

संशोधनाचे उद्देश (Objectives of the study):

नागरी स्थानिक स्वशासनाचा अविभाज्य घटक असणारा कर्मचारी समाजिक, आर्थिक, वैयक्तिक दृष्टीकोणातुन स्थीर असेल, समाधानी असेल तरच, शासनाचे धोरण विकासयोजना चांगल्याप्रकारे राबवू शकेल व यातुनच स्थानिक स्वशासन आपले कार्य यशस्वीरित्या करु शकेल यासाठीच त्यांच्या नेमक्या समस्या, अडचणी शोधून त्यावर काही उपाय शोधता येतील काय? या सर्व अंगाचा विचार करण्यासाठी संशोधकाने खालील प्रमाणे उद्देश मांडले आहेत.

1) नागरी स्थानिक शासनात महिला कर्मचाऱ्यांच्या सहभागाचे प्रमाण कसे आहे हे जाणुन घेणे.
2) आरक्षणामुळे महिलांचा सहभाग नागरी स्थानिक शासनातील प्रशासनात वाढला आहे की नाही याचा शोध घेणे.
3) महिला कर्मचारी म्हणून उदभवणाऱ्या वेगवेगळया समस्यांचा शोध घेणे.
4) नागरी प्रशासनात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची शैक्षणिक, आर्थिक, कौटुंबीक पार्श्वभुमी माहित करुन घेणे.
5) महिला कर्मचाऱ्यांना पुरुष कर्मचारी सहकार्य करतात काय, याचा अभ्यास करणे.

गृहितके (**Hypothesis**):

प्रस्तुत संशोधन कार्य योग्य दिशेने जाण्यासाठी खालील गृहितकृत्ये निर्माण करण्यात आली आहेत.

1) महिला आरक्षाणामुळे नागरी प्रशासनात महिला कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढलेला आहे.

2) महिला कर्मचाऱ्यांना प्रशासनातील उच्च व जबाबदार पदावर नियुक्ती दिली जात नाही.

3) नागरी प्रशासनाच्या ज्या कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांची संख्या जास्त आहे तिथे भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई या सारखे दोष इतर कार्यालयाच्या तुलनेत कमी आहेत.

4) ज्या संघटनेत उच्च पदावर पुरुष अधिकरी आहेत तिथे महिला कर्मचाऱ्यांचे शोषण केले जाते (उदा.मानसिक खच्चिकरण).

5) महिला व पुरुष कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय वर्तनात फरक आहे (उदा. नीती धैर्य, मनोबल)

6) ज्या कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे, ती कार्यालये महिला नागरिकांच्या कार्यास प्राधान्य देतात.

संशोधन पध्दती (**Research Methodology**):

"नागरी स्थानिक स्वशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास" प्रस्तुत संशोधनासाठी खालील संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल.

1) संशोधनाचेशिर्षक (Topic of the Research):

"नागरी स्थानिक स्वशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या : नांदेड जिल्हा एक चिकित्सक अभ्यास"

2) संशोधनाचे स्वरुप (Nature of the Research):

संशोधनाचे स्वरुप हे सामाजिक शास्त्रीय पध्दतीचे असेल या संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अध्ययन पध्दतीचा वापर केला जाईल. तसेच

ग्रंथालयीन अध्ययन पध्दीचाही वापर केला जाईल या अनुषंगाने प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा वापर अध्ययनासाठी करण्यात येईल.

3) **संशोधनाचेक्षेत्र (Area of the Research):**

नागरी स्थानिक स्वशासनात कर्मचारी वर्गाची भुमिका अतिशय महत्वपूर्ण आहे. हा कर्मचारी त्यातही महिला कर्मचारी आपल्या दैनंदिन जीवनात समाधानीअसेल तरच योग्य पध्दतीने आपले कार्य करु शकेल कारण त्यांच्या कार्यावरुनच शासनाची प्रतिमा समाजात उठून दिसते. म्हणुन प्रस्तुत संशोधनासाठी “नागरी स्थानिक स्वशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या : नांदेड जिल्हा एक चिकित्सक अभ्यास” हा विषय निवडला आहे. यामध्ये नांदेड जिल्हा तसेच नांदेड जिल्हयातील विविध तालुके व त्या तालुक्यातील विविध नागरी स्थानिक संस्थातील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा सखोल व चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येईल.

4) **माहिती संकलन (Collection of Information):**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी खालील स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

अ) प्राथमिक स्त्रोत :

संशोधनाच्या माहिती संकलनासाठी विविध प्राथमिक स्त्रोतांचा वापर करण्यात येईल यासाठी संशोधन क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांच्या मुलाखती प्रश्नावली, अनुसूचित इत्यादी द्वारे माहितीचे संकलन करण्यात येईल.

ब) दुय्यम स्त्रोत :

संशोधनाकरीता आवश्यक माहिती संकलनासाठी द्वितीय स्त्रोतात संदर्भग्रंथ प्रकाशीत साहित्य, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिक, नागरी स्थानिक प्रशासनातील अहवाल,इंटरनेट, ई-मेलद्वारे उपलब्ध माहितीचा आधार घेण्यात येईल.

5) **नमुना निवड** (Sampling):

संशोधनासाठी नांदेड जिल्हयातील नागरी स्थानिक प्रशासनातील महिला कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली. यात एक महानगरपालिका, चार नगर परिषदा व दोन नगर पंचायती क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची समावेश असुन ही निवड लॉटरी पध्दतीने प्रमाणशीर आधारावर यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली.

6) **प्रकरणाची योजना ():**

I) प्रस्तावना

II) महाराष्ट्रातील महिला धोरण व स्थिती.

III) कर्मचारी प्रशासन - संकल्पना व समस्या.

IV) नांदेड जिल्हा नागरी प्रशासन व महिला कर्मचारी.

V) महिला कर्मचाऱ्यांची प्रशासकीय भूमिका.

VI) निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथ सुचीः

1) S.C.Goel : Urban Local Self Gov. Deep & Deep of Publication New Delhi.

2) S.R.Nigam : Local government.

3) Pradeep Sachdeva : Urban Local Govt. and Administration in India.

4) U.B.Singh : Urban Local Government Rawat Publications, Jaipur.

5) डॉ.गोविंद यमलवाड : स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन नांदेड.

6) डॉ.दाते प्रा.एखेळीकर : भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद.

7) लक्ष्मणराव लटके, रणजित चव्हाण : नगरपालिका सभाशास्त्र अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई.

8) डॉ.अर्जुनराव दर्शनकार : पंचायतराज आणि नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

9) डॉ.शांताराम भोगले : भारतातील स्थानिक शासन, विद्याप्रकाश नागपूर.

10) डॉ.शिरसाठ, डॉ.बैनाडे : भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद.

11) प्रा.व्ही.बी.पाटील : महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के.सागर पुणे.

12) डॉ.गायकवाड टी.एन. : महाराष्ट्रातील स्थानिक प्रशासन, अहमपूर.

13) डॉ.श्याम वाघमारे, डॉ.सुरेश गजभारे : महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी प्रशासन.

14) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965.

15) मुंबई प्रांतिक महानगरपलिका अधिनियम 1949.

16) डॉ.अशोक सोनकांबळे/प्रा.सी.एम.कहाळेकर : महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी स्थानिक स्वशासन, अरुणा प्रकाशन लातूर.

संदर्भ ग्रंथ सुची:

1) योजना

2) कुरुक्षेत्र

3) यशमंथन

4) लोकराज्य

5) देशोन्नती

6) दै.लोकमत

7) दै.लोकपत्र

8) महाराष्ट्र टाईम्स्

:: संशोधक ::
इरबतनवाड गोदावरी तुकाराम
सहाय्यक प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
ता.बिलोली, जि.नांदेड.

:: मार्गदर्शक ::
डॉ.जी.टी.यमलवाड
संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख
लोकप्रशासन विभाग
लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय,
धर्माबाद, जि.नांदेड-431809